महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे यांचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, विश्वनाथपुरम्, अंबेजोगाई रोड,लातूर

**फिजीओथेरपी (बी.पी.टी.एच) पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० याप्रमाणे वाढ करण्यास शासनाची मान्यता देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एमईडी १०१६/प्र.क्र.३९३/१६/शिक्षण-२
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : २७ ऑक्टोबर, २०१६

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/१५२०/२०१५, दिनांक १९/१२/२०१५
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/फिजीओथेरपी/प्रेक्ष/वाढ/मइकॉऑफि, लातूर/युजी-६/२०१६/१ अ, दिनांक २६/०९/२०१६

प्रस्तावना:

महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे यांचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, विश्वनाथपुरम्, अंबेजोगाई रोड, लातूर या संस्थेतील फिजीओथेरपी पदवी (B.P.T.H) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्याचा प्रस्ताव वरील संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. त्यानुसार सदरहू संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालकांनी सक्षमता तपासणी अहवाल संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील फिजीओथेरपी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० याप्रमाणे वाढ करण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील पदवी फिजीओथेरपी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : संदर्भ क्र. २ अन्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन शासन याद्वारे महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे यांचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, विश्वनाथपुरम्, अंबेजोगाई रोड, लातूर या संस्थेतील फिजीओथेरपी पदवी (B.P.T.H) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० याप्रमाणे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून वाढ करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे मान्यता देत आहे:-

०१)या महाविद्यालयातील फिजिओथेरपी पदवी या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० वरुन ४० इतकी वाढविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

०२)राज्य शासन/मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

०३)राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

०४)महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युट (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

०५)संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

०६)सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यामुळे संस्था आवर्ती / अनावर्ती वाअन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

०७)शासकीय वैद्यकीय/भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरण्यात येणार नाहीत.

०८)संस्थेने गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

०९)महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापुर्वी संस्था विहित मानकांची पुर्तता करीत आहे याची खात्री करावी.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स.सं.बेनके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री(वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा.अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन आवार, अलीयावर मार्ग, खेरवाडी, बांद्रा (पुर्व)
प्राचार्य, महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड एज्युकेशनल रिसर्च, पुणे यांचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, विश्वनाथपुरम्, अंबेजोगाई रोड, लातूर
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲन्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, २६८/७०, चंद्रेश भवन, तळ मजला, रुम नं.९, शहीद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-२)